**नियमित फौजदारी खटल-१२४४/२०२०**

**नि. १८/क, महा.सरकार / महेश रोटी**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – फिरोज अमिन मुलानी

वय - ३९

धंदा - शेती,

राहणार - रुईकर कॉलनी,कोल्हापूर

**सरतपास सरकार तर्फे सरकारी वकील श्री.ए.एन.डोईफोडे**

आरोपी महेश मंजूनाथ रोटी याला मी ओळखतो कारण गाडी संदर्भात आमच्यामध्ये व्यवहार झालेला होता. आरोपी माझी गाडी घेऊन गेला होता परंतू मला त्याचे पैसे दिलेले नव्हते. त्यामुळे मी दि.१५/०६/२०१९ रोजीची सदर फिर्याद दाखल केलेली होती. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. सदर फिर्यादीमधील मजकूराबाबत माहिती नाही. सदर फिर्यादीवर असलेली सही ही माझी आहे. सदर फिर्यादीस सही ओळखणेपुरते **नि.१९** आहे.

(प्रस्तुत फिर्यादीने फिर्याद दिलेचे मान्य करुन तिच्यावर आपली सही ओळखली आहे. परंतू तो घटनेबाबत तसेच फिर्यादीमधील मजकूराबाबत माहिती नाही असे सांगत आहे. म्हणून सरकारी वकीलांनी सत्य वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेसाठी त्याचा उलटतपास घेणेची परवानगी मागीतली. एकंदरी हकीकतीचा विचार करता, भारतीय साक्ष अधिनियम कलम १५७ प्रमाणे साक्षीदाराचा उलटपास घेण्यास अभियोग पक्षास परवानगी मंजूर करण्यात येत आहे.)

**सरकारी पक्षातर्फे उलटतपास**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.१०/०४/२०१८ रोजी आरोपी माझ्या सास-याचे नावे असणारी ओमणी कार घेऊन गेला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरची कार आरोपीने भंगारामध्ये विकली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझी फसवणूक केली. आता मला फिर्याद वाचून दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या फिर्यादीतील आधोरेकित भाग अ मधील मजकूर मी पोलिसांना सांगीतला होता. माझ्या फिर्यादीतील आधोरेकित भाग

अ मध्ये काय लिहिलेला आहे, याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही सदरच्या आधोरेकित भाग अ प्रमाणे मी पोलिसांना सांगीतले मुळे तसा मजकूर माझ्या जबाबात लिहिलेला आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची व माझी न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आरोपीविरुध्द माझी कोणतीही तक्रार नाही. मला खटला पुढे चालवावयाचा नाही तसेच इतर साक्षीदार तपासवायाचे नाही.

**आरोपीतर्फे विधिज्ञ ए.एम.चव्हाण यांचे मार्फत सुरु...**

५. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व आरोपीमध्ये कोणताही पैशांचा व्यवहार शिल्लक राहिलेला नाही. आता माझी आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार नाही. प्रस्तुतचा खटला मला चालविणेचा नाही.

६. फेरतपास नाही.

जबाब माझ्या समक्ष नोंदविला.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**सही/-**

**(श्रीमती एम. डी. कश्यप)**

**मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर**

**दिनांक-०६/०८/२०२६**